



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३४८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.२९ जुलै २०२५


## रायगड जिल्हा, पुणे घाट, सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, मुंबई :** रायगड जिल्हा आणि पुणे घाट, सातारा घाट परिसरात पुढील २४ तासांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

गोंदिया जिल्ह्यातील बाघ नदीने धोका पातळी, रायगड जिल्ह्यातील कुंडलीका नदीने इशारा पातळी ओलांडली असून नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील खडकवासला, पवना धरणातून नियंत्रित विसर्ग चालू असून जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

परभणी जिल्ह्यात हादगाव पाथरी येथे २० लोकांना मास्जिदीमध्ये स्थलांतरित करण्यात आले होते. तसेच माटेगाव येथे पूलावरुन पाणी जात असल्याने झीरो फाटा रस्ता सुरक्षास्तव बंद करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील उरण जवळ समुद्रात बोट पलटी झाली असता त्यामध्ये असणाऱ्या ८ जणांपैकी ५ व्यक्ती पोहत बाहेर आल्या असून ३ व्यक्तींचे कोस्ट गार्ड, स्थानिक प्रशासन व बचाव पथकांच्या मदतीने शोधकार्य चालू आहे.

**तापोळा महाबळेश्वर रस्ता बंद !**

सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर तालुक्यात सततच्या अतीवृष्टीमुळे भूस्खलनाच्या अनुषंगाने सतर्कतेचा सूचना देण्यात आल्या असून भूस्खलनाच्या अनुषंगाने तापोळा महाबळेश्वर रस्ता सुरक्षास्तव बंद ठेवण्यात आला असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते क्षयरोगमुक्त नागपूर मोहिमेचा शुभारंभ



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, नागपूर :** संसर्गजन्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्षयरूग्णांवर वेळीच निदान आणि वेळीच उपचार झाला तर यातून संसर्गाचा धोका उरत नाही. नागपूर महानगरात उपचारा अभावी कोणताही क्षयरोग रूग्ण राहू नये यादृष्टीने इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर वतीने फिरते क्षयरोग निदान व तपासणी केंद्राच्या वाहनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. यावेळी आमदार प्रविण दटके, डॉ. आशिष देशमुख, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, दयाशंकर तिवारी, अधिष्ठता डॉ. रवि चव्हाण व मान्यवर उपस्थित होते. नागपूर महानगरातील सुमारे १ लाख उच्च जोखमीच्या व्यक्तींची या मोहिमेद्वारे तपासणी केली जाणार आहे.

## जुन्या वादाने घात केला!

### एका रात्रीत दोघांचा जीव घेतला...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, नागपूर :** उपराजधानी नागपूर शहरात रविवारी रात्री अवघ्या काही तासांच्या अंतरावर दोन हत्या झाल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. दोन भागांत घडलेल्या या दुहेरी खून प्रकरणामुळे नागपूर शहर पुन्हा एकदा गुन्हेगारीच्या छायेखाली आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या घटनांनी पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने संवेदनशील मानल्या जाणाऱ्या नागपूर शहरात एका रात्रीत दोन हत्या होणे, ही चिंतेची बाब ठरू लागली आहे.

पहिली घटना नागपूरच्या मध्यवर्ती भागात असलेल्या लकडगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुनी मंगळवारी परिसरातील गुजरी चौकात घडली. जुन्या वैमनस्यातून चार आरोपींनी हर्षल अनिल सौदागर (वय २४) या युवकावर चाकूने हल्ला करून त्याचा खून केला. आरोपी प्रज्वल कनारकर, प्रज्वल डोरले, वैभव हेडाऊ आणि राहुल शेटे हे चौघेही स्थानिक रहिवासी असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. वृत्तानुसार, हर्षल आणि मुख्य आरोपी प्रज्वल कनारकर यांच्यात काही दिवसांपूर्वी वाहन उचलण्यासंबंधी वाद झाला होता. मित्रांनी मध्यस्थी करून वाद मिटवला होता. मात्र, त्यात दडपलेला राग रविवारी रात्री पुन्हा उफाळून आला. रात्री प्रज्वल कनारकर आणि त्याचे तीन मित्र गुजरी चौकात बसले असताना, हर्षल दुचाकीवर तिथे पोहोचला आणि चारही आरोपींना धडक देण्याचा प्रयत्न केला. यावरून वाद उफाळून निघाला आणि हर्षलने शिवीगाळ केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. याचदरम्यान प्रज्वल कनारकर घरात जाऊन चाकू घेऊन आला आणि हर्षलच्या गळ्यावर सपासप वार केले. रक्तबंबाळ अवस्थेतील हर्षलला तात्काळ शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते. मात्र, पोलिसांनी काही तासांतच चौघांनाही अटक केली असून गुन्हा दाखल करून अधिक तपास सुरू केला आहे.

# ठाकरे बंधूंच्या भेटींचा शिंदेसेनेला फटका?



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२८, मुंबई :**

शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्या युतीची शक्यता वाढली आहे. एकाच महिन्यात दोनदा उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे सोबत आल्यानं त्यांच्या मनोमिलनाच्या चर्चा जोरात आहेत. शिवसेना उबाठा आणि मनसेची विधानसभा निवडणुकीत धूळधाण उडाली. त्यांच्या पक्षांची अवस्था बिकट आहे. त्यामुळे दोन्ही बंधूंना एकमेकांच्या मदतीची प्रचंड निकड आहे. ५ जुलैला विजयी मेळाव्यासाठी दोघे जण एकत्र आले. त्यानंतर २२ दिवसांनी राज ठाकरे मातोश्रीवर पोहोचले. उद्धव ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे माताश्रीवर गेले होते. राज आणि उद्धव यांच्या भेटीगाठींचा पहिला फटका शिंदेसेनेला बसला आहे.

उद्धव आणि राज यांची युती झाल्यास काय होईल, याचे आडाखे आता सगळेच पक्ष बांधू लागले आहेत. मराठीच्या मुद्द्यावरुन दोन्ही ठाकरेंनी आक्रमक भूमिका घेतली. प्राथमिक शाळेत हिंदी भाषा सक्ती करण्याविरोधात शिवसेना उबाठा आणि मनसेनं ठाम भूमिका घेत विरोध दर्शवला. जनमत विरोधात जात असल्याचं लक्षात येताच महायुती सरकारनं दोन्ही जीआर मागे घेतले. विशेष म्हणजे हे जीआर शिंदेसेनेच्या दादा भुसे यांच्या शिक्षण खात्यानं काढले होते. त्यामुळे शिंदेसेनेवर मोठी नामुष्की ओढवली.

राज आणि उद्धव ५ जुलैला विजयी मेळाव्यात एकत्र आले. सरकारनं जीआर रद्द केल्यानंतर या मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. ठाकरे बंधू तब्बल २० वर्षांनी एकत्र आले. दोघांची कुटुंबंदेखील सोहळ्याला उपस्थित केली. तेव्हापासून उद्धवसेनेतून मुंबई आणि आसपासच्या भागातून होणारी गळती थांबली आहे. ठाकरे बंधूंची युती होण्याची शक्यता वाढलेली असताना अनेक माजी नगरसेवक पक्षात थांबले आहेत.

विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरेंच्या पक्षाला मोठी गळती लागली. उद्धवसेनेच्या अनेक माजी नगरसेवकांनी शिंदेसेनेचा रस्ता धरला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उद्धवसेनेचे जवळपास निम्मे माजी नगरसेवक गळाला लावले. पण उद्धव आणि राज ठाकरे ५ जुलैला एकत्र दिसल्यापासून आणि युतीची चर्चा सुरु झाल्यानं अनेक माजी नगरसेवकांनी पक्षातच राहण्याचा निर्णय घेतल्याचं दिसतं.

दुसरीकडे शिंदेसेनेकडे जाणारा माजी नगरसेवकांचा ओढा रोखण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एक निर्णयदेखील महत्त्वाचा ठरला आहे. शिंदे यांच्या अखत्यारित येणाऱ्या नगरविकास विभागाच्या फाईल्स मंजुरीसाठी मुख्यमंत्री कार्यालयाला पाठवाव्या लागणार आहेत. तसा निर्णय फडणवीस यांनी घेतलेला आहे. पैशांची उधळपट्टी रोखण्यासाठी फडणवीस यांनी हा निर्णय घेतल्याचं समजतं. या खात्याच्या मार्फत शिवसेनेचा वरचष्मा असलेल्या महापालिकांनाच अधिक निधी जात असल्याच्या तक्रारी पावसाळी अधिवेशनाच्या कालावधीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी केल्या होत्या.

शिंदेसेनेत गेलेले अनेक माजी नगरसेवक महापालिका निवडणुकीसाठी कामाला लागले होते. विशेष म्हणजे निधीचं कारण देतच अनेक माजी नगरसेवकांनी शिंदेसेनेत प्रवेश केले. सध्या अनेक पालिकांवर प्रशासक नेमण्यात आलेले आहेत. त्यामुळे पालिकांचा कारभार नगरविकास विभागाकडूनच चालतो. त्यामुळे उद्धवसेनेच्या माजी नगरसेवकांनी शिंदेसेनेची वाट धरली. पण फडणवीस यांच्या एका निर्णयानं पक्षप्रवेश केलेले अनेक माजी नगरसेवक अस्वस्थ आहेत.

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसाची लोकसेवेच्या उपक्रमांनी सुरुवात

### * मातोश्री वृद्धाश्रमात अन्नदान आणि भेटवस्तु वाटप



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री, आ. सुधीर मुनगंटीवार यांचा वाढदिवस ३० जुलै रोजी साजरा होतो. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध राज्यभर व जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. रविवारी (२७ जुलै) बल्लारपूर येथील ओबीसी आघाडीचे अध्यक्ष अमोल झाडे यांनी विसापुर (जि.चंद्रपूर) येथील मातोश्री वृद्धाश्रमात जेष्ठांसाठी अन्नदान व भेटवस्तू वितरणाच्या कार्यक्रमाने लोकसेवेच्या उपक्रमाची सुरूवात केली. या कार्यक्रमात आ. सुधीर मुनगंटीवार यांना जेष्ठ नागरिकांचे आशीर्वाद घेतले. ते म्हणाले, 'समाजाच्या या आधारस्तंभांप्रती आपुलकी आणि सन्मान व्यक्त करण्याची संधी मिळाली, हे माझं खरोखरच भाग्य आहे. ज्येष्ठांच्या डोळ्यांतील प्रेम आणि आशिर्वादांनी मन गहिवरून आलं,' अशी भावनिक प्रतिक्रिया यावेळी आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. आ.मुनगंटीवार यांच्या ३० जुलै रोजी येणाऱ्या वाढदिवसाची सुरुवात समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या स्नेहाशी नाते जडवत, अत्यंत भावनिक आणि सेवाभावी वातावरणात संपन्न झाली. या कार्यक्रमाचे आयोजन अमोल झाडे आणि त्यांच्या टीमतर्फे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अमोल झाडे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आमदार मुनगंटीवार यांनी विशेष अभिनंदन केले.याप्रसंगी भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंग चंदेल, शहराध्यक्ष रणंजय सिंग, ओबीसी आघाडीचे अध्यक्ष अमोल मोरे, अजय जयस्वाल, विद्याताई देवाळकर, अमोल झाडे, किशोर पंदीलवार, सतीश कनकम, सरिता कनकम, देवा वाटकर, पिंटू देऊळकर, किशोर मोहूर्ले, जयश्री मोहूर्ले, संदीप पोडे आदी मान्यवर उपस्थित होते. आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचा वाढदिवस दरवर्षी जनसामान्यांच्या सेवेसाठी समर्पित उपक्रमांनी साजरा होतो आणि तो एक सामाजिक सोहळा ठरतो. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि गरजूंच्या मदतीसारख्या विविध क्षेत्रांतील उपक्रमांच्या माध्यमातून राज्यभरात हा दिवस जनहितार्थ साजरा केला जातो. ही परंपरा त्यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धती, सामाजिक भान आणि सेवाभावाचे जिवंत प्रतीक ठरली आहे. यावर्षीच्या जनसेवा महोत्सवाची सुरुवातच वृद्धाश्रमातील अन्नदानासारख्या भावनिक आणि मूल्याधिष्ठित उपक्रमाने झाली, ही गोष्ट अत्यंत आशादायक आणि प्रेरणादायी ठरली आहे, हे विशेष.

## पुणे रेव्ह पार्टी प्रकरण! २२ आणि २३ वर्षांच्या पोरी, ४४ लाखांचा माल जप्त



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** पुण्यातील खराडीतील हॉटेलमध्ये सुरू असलेल्या ड्रग पार्टीवर गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने रविवारी पहाटे छापा घालून मोठी कारवाई केली. या कारवाईत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांचा जावई, दोन कुख्यात बुकींसह पाच पुरुष व दोन महिलांना अटक करण्यात आली आहे. आरोपींना शिवाजीनगर न्यायालयात हजर केले असता, मंगळवारपर्यंतची (२९ जुलै) पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**खडसेंचे जावई कसे अडकले? वाच स्टोरी !**


ही कारवाई खराडीतील स्टेबर्ड अझुर सुट हॉटेलमधील खोली क्रमांक १०२ मध्ये करण्यात आली. आरोपींकडून २.७० ग्रॅम कोकेनसदृश पदार्थ, ७० ग्रॅम गांजा, १० मोबाइल, दोन कार, हुक्का पॉट आणि दारू, मोबाइल आणि दोन चारचाकी वाहने असा एकूण ४१ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपींवर खराडी पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यात रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल मनीष खेवलकर (वय ४१, रा. हडपसर), निखिल जेठानंद पोपटाणी (वय ३५, माळवाडी), समीर फकीर सय्यद (वय ४१, एनआयबीएम रस्ता), सचिन सोनाजी भोंबे (वय ४२, वाघोली), श्रीपाद मोहन यादव (वय २७, आकुर्डी), ईशा देवज्योत सिंग (वय २२, औंध), प्राची गोपाल शर्मा (वय २३, म्हाळुंगे) यांच्यावर गुन्हा दाखल करून, त्यांना अटक करण्यात आली आहे. उपायुक्त निखिल पिंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित हॉटेलमधील तीन रूम डॉ. खेवलकर यांच्या नावे बुक झाल्या होत्या. अटकेपूर्वी आरोपींची वैद्यकीय चाचणी करण्यात आली. पोपटाणी याचा मूळ व्यवसाय सिगारेट वितरणाचा आहे. सय्यदचा हार्डवेअर व्यवसाय असून, यादव बांधकाम व्यावसायिक आहे.

ही कारवाई गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त पंकज देशमुख, उपायुक्त निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विजय कुंभार, शैलेश संखे, सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक अस्मिता लाड, राजेश माळेगावे आदींनी केली. वरिष्ठ निरीक्षक विजय कुंभार याचा तपास करत आहेत.

# संपादकीय



## आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन

आजचा दिवस म्हणजे २९ जुलै हा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक स्तरावर वाघांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे म्हणून सेंट पिटरर्सबर्ग येथे झालेल्या व्याघ्र परिषदेत २९ जुलै हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून घोषित करण्यात यावा असा ठराव मांडण्यात आला त्याला सर्व देशांनी अनुमोदन दिल्याने हा दिवस जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. वाघ हा जंगलाचा राजा आहे. जंगलातील त्याची निर्धास्त चाल गगनभेदी डरकाळी या त्याच्या गुण वैशिष्ट्यामुळे वाघ हा सर्वांना आकर्षित करणारा प्राणी आहे. जगभरात कोणत्याही अभयारण्यात, जंगलातील सफरीवर गेलेल्या पर्यटकांचे पहिले आकर्षण वाघ दिसण्याचे असते. भारतीय संस्कृतीत तर वाघाला आदरयुक्त भीतीचे स्थान आहे. वाघाला जंगलाचा राजा असे संबोधले जाते.

वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी असून जनमानसात शौर्य, राजबिंडेपणा, सौंदर्याचे, राकटतेचे प्रतीक आहे म्हणूनच हिंदू संस्कृतीत वाघ पार्वतीचा अवतार असलेली देवी महिषासुरमर्दिनीचे व तिच्या अनेक रूपांचे वाहन बनले आहे. वाघ आणि आदिवासी जमातींचा हजारो वर्षाचा संबंध आहे. आदिवासी जमातीत वाघाला देव मानतात. वाघांचा कोप होऊ नये म्हणून ते वाघाला देव मानून त्याची पूजा करतात. वाघांच्या अनेक जाती आहेत. भारतातील पट्टेरी वाघ जगातील वैशिष्ट्यपूर्ण प्राण्यांपैकी एक मानला जातो. भारत हे वाघांचे माहेरघर मानले जाते. भारताप्रमाणेच आशिया व आफ्रिका खंडातील इतर देशातही वाघांचे अस्तित्व आढळते. पूर्वी वाघांची संख्या खूप होती परंतु मधल्या काळात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली. केवळ भारतातच नाही तर जगभरात वाघांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. खेळ, मनोरंजन आणि वाढत्या लोकसंख्येमुळे वाघांच्या आधीवासावर होणारे मानवी अतिक्रमण तसेच वाघांच्या अवयवांची तस्करी करण्यासाठी केली जाणारी शिकार यामुळे दिवसेंदिवस वाघांचे प्रमाण कमी होऊ लागले. वाघांचे प्रमाण इतके कमी झाले की एकेदिवशी वाघांची डरकाळी लुप्त होईल की काय अशी भीती निर्माण झाली. ही भीती अनाठायी नाही. कारण गेल्या काही वर्षात वाघांच्या शिकारीच्या अनेक घटना आपल्या देशात घडल्या आहेत. चार वर्षांपूर्वी झालेल्या अवनी वाघिणीची शिकार कोण विसरेल? अवनी वाघिणीची शिकार झाल्यावर संपूर्ण देश हळहळला होता. अवनी प्रमाणेच गोव्यातही दोन वाघिणींची शिकार करण्यात आली होती. मागील चार वर्षात अनेक वाघांचे मृतदेह वनविभागाला आढळून आले आहेत. वाघ कमी होणे ही धोकादायक बाब आहे कारण जंगलात वाघ असणे हे समृद्ध जंगलाचे लक्षण समजले जाते. जंगलात असलेल्या अन्न साखळीत वाघ हा प्रमुख घटक समजला जातो. वाघांमुळे जंगलातील तृणभक्षी प्राणी व वनस्पती यांच्यात समतोल राखला जातो. वाघ नसतील तर जंगलात तृणभक्षी प्राण्यांची संख्या अमर्याद वाढेल व इतर निसर्गसंपदेवर या गोष्टीचा ताण पडेल परिणामी निसर्गचक्रच बिघडून जाईल. वाघ जंगलात असणे हे जंगलाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. वाघ असलेल्या जंगलात साधे लाकडूतोड करणारे व जंगलावर अवलंबून असणारव लोक भीतीपोटी जंगलात जात नाही त्यामुळे जंगलेही सुरक्षित राहतात. वाघ नाहीसे झाले की जंगलही नाहीसे होतील आणि जंगले नाहीसे झाल्यास निसर्गचक्रच बिघडून जाईल आणि त्याचे दुष्परिणाम केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागतील. तसे होऊ द्यायचे नसेल तर वाघांचे अस्तित्व टिकवले पाहिजे. आज या आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने वाघांचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घ्यायला हवी.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# नागपंचमी आणि नाभिक समाज

**जाणुन घ्या...**
**या दिवशी सलून दुकाने बंद का असतात?**

श्रावण महिना म्हणजे सणांचा पवित्र महिना, आणि या पवित्र महिन्यातील पहिलाच सण म्हणजे नागपंचमी...

आपल्या कुटुंबाची सदैव नागाच्या भयापासून सदासर्वकाळ मुक्तता व्हावी व नागदेवतेचा कृपाशीर्वाद कुटुंबातील सर्वांना प्राप्त व्हावा यासाठी प्रतीवर्षी श्रावण शुक्ल पक्षातील पंचमीला म्हणजेच नागपंचमीला महाराष्ट्रात नागदेवतेचे घरोघरी पुजन केले जाते. यावर्षी नागपंचमीचा सण उद्या म्हणजेच मंगळवारी २९ जुलै रोजी सर्वत्र साजरा होत आहे.

या पवित्र दिवशी प्रत्येक घरातील स्रिया नवीन वस्त्र, अलंकार परिधान करुन मनोभावे नाग देवतेची पुजा करतात. घरामध्ये नागाची प्रतिमा अथवा जिवती लाऊन पूर्ण महिनाभर पुजा अर्चना केली जाते.

नागपंचमीचा सण हा विशेष करुन स्त्रियांचा सण,

पुराणातील विविध प्रचलित कथांनुसार हा सण राज्यभर विविध भागात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो.

परंतु या सणाचा मुख्य उद्देश मात्र एकच असतो, आणि तो म्हणजे नाग भयापासून मुक्तता आणि नागाचे आणि त्यांच्या प्रजातीचे संवर्धन.

खरे तर नागदेवता ही इच्छेशी संबंधित देवता आहे, तो इच्छेचा प्रवर्तक आहे. इच्छेचा प्रवर्तक म्हणजेच इच्छेला गती देणारा किंवा सकाम इच्छेची पूर्तता करणारा.

नागपंचमीच्या दिवशी नागदेवताजन्य तत्त्वाच्या इच्छालहरी भूमीवर अवतरलेल्या असल्याने वायूमंडलात नागदेवताजन्य तत्त्वाचे प्रमाण जास्त असते. म्हणुनच या दिवशी कापणे, चिरणे आणि तळणे, या कृतींमधून रज-तमाशी संबंधित इच्छालहरी निर्माण होतात. या स्पंदनांचा व्यक्तीवर परिणाम होतो, तसेच देवताजन्य इच्छालहरींच्या कार्याला अवरोध होतो. यामुळे नागदेवताजन्य



लहरींना कार्य करण्यात अडथळा प्राप्त होऊ शकतो. म्हणूनच नागपंचमीच्या दिवशी अशा प्रकारच्या कृती केल्याने पाप लागू शकते अशी धारणा आहे. आणि केवळ याच भावनेतून नागपंचमीच्या दिवशी कापणे, चिरणे, तळणे, तसेच भूमी उकरणे, नांगरणे, या कृती निषिद्ध मानल्या आहेत.

या दिवशी बहुतांश भागात घरातील महिला काही तळत, कापत अथवा भाजत नाहीत.यामागे दुसरा मुख्य हेतु देखील असतो की,घरातील गृहिणीला

**संजय पंडित**
**पत्रकार,ठाणे**
**मो.९८१९६३७४६१**

किमान या निमित्ताने एक दिवस तरी आराम मिळावा, आणि अनवधानाने नागाला काही इजा होऊ नये म्हणून शेतकरी देखील आपली शेतातील सर्व कामे बंद ठेवतात.

थोडक्यात सांगायचे झालेच तर, आज २१व्या शतकात देखील राज्यभर हा सण आनंदाने, भक्तीभावाने आणि मोठ्या उत्साहाने सर्वत्र साजरा होतो.

आपल्या राज्यातील नाभिक समाजासाठी मात्र या सणाचे वेगळेच असे आणण्यसाधारण महत्व आहे. म्हणुनच तर राज्यातील तमाम नाभिक बांधव समाजाचे आराध्य दैवत संत सेनाजी महाराज यांच्या पुण्यतिथी प्रमाणे नागपंचमी हा सण देखील मोठ्या आनंदाने आणि भक्तीमय वातावरणात साजरा करतात.

नाभिक पुराण या अतिप्राचीन ग्रंथानुसार,

**नाभिक म्हणजेच शेषनाग...**

**न्हावी हाच शेषनागाचा अवतार...**

या ग्रंथातील कथेनुसार नाभिकाची उत्पत्ती म्हणजे न्हाव्याची उत्पत्ती ही भगवान शंकराच्या नाभीतून म्हणजे बेंबीतून झाली आहे.

या कथेनुसार सृष्टीची निर्मिती झाली तेंव्हा पृथ्वीवर महाप्रलय होता. सर्वत्र पाणीचपाणी आणि अंधार पसरलेला होता. तेंव्हा भगवान शंकराने आपला तिसरा डोळा उघडून हा प्रलय थांबवला होता.

यानंतर त्यांनी पृथ्वीवर पर्वत, सागर आणि नाद्यांची निर्मिती केली, तर आकाशात चंद्र, सूर्य, तारे आणि नक्षत्रांची स्थापना केली. भगवान शंकराच्या कृपेने विष्णुच्या नाभीतून ब्राम्हणाची उत्पत्ती झाली. तो ब्राम्हण चतुर्मुख होता. त्याच ब्राम्हणाला भगवान शंकराने सृष्टीची निर्मिती करण्यास सांगितले. तेंव्हा भगवान विष्णुने शंकराला सांगितले की, ब्राम्हणाचे मुंज बंधन झाल्याशिवाय त्यास ब्राम्हणत्व प्राप्त होणार नाही. आणि यासाठी जाणवे व शिखाची गरज होती.

त्यावेळी शिखाचे कार्य कुणी करावे हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. शिखा प्राप्त होण्यासाठी नाभिकाची निर्मिती आवश्यक होती. तेंव्हा भगवान शंकराने आपल्या कंठातील शेषाला स्वतःच्या नाभीकमलातून जन्म घेण्यास सांगितले. सुरुवातीला शेषाने भगवंतापासून दुर व्हावे लागेल म्हणुन विरोध केला, आणि भगवान शंकराला विचारले की, या जन्मानंतर मला कशाची प्राप्ती होईल?

यावर भगवान शंकर उत्तरले, तुला सर्व कामात मोठा मान सन्मान प्राप्त होईल. तुझ्याशिवाय ब्राम्हणाला देखील ब्राम्हणत्व प्राप्त होणार नाही. तु सर्वांचाच आवडता होशील व श्रावण महिन्यातील नागपंचमीला तुझे घराघरात पूजन होईल. स्त्रियांचा तु भाऊ असशील आणि तुझ्या वंशात उत्पन्न झालेल्या सर्वांनाच मान सन्मान मिळेल.

भगवान शंकर आणि विष्णुच्या विनंतीनुसार अखेर शेषाने भगवान शंकराच्या नाभीतून पृथ्वीतलावर मनुष्य रूपात जन्म घेतला.नाभीच्या कुंडलीणीतून जन्म घेतल्यामुळे त्याचे गोत्र कौडील्य झाले, आणि शेषाचाच अवतार असलेल्या भगवान शंकराच्या नाभीतून जन्म घेतल्यामुळे शेषनागास मनुष्य अवतारात 'नाभिक' हे नाव प्राप्त झाले.आणि म्हणुनच शेष नागाला नाभिकांचा वंशज म्हणतात.

अशा प्रकारे नाभिकाचा जन्म तर झाला पण त्याला ब्रम्ह देवाची मुंज करण्यासाठी क्षुरा म्हणजे हत्याराची गरज होती. तेंव्हा स्वतः भगवान शंकराने आपल्या अंतकरणातील पाचव्या सूक्ष्म वेदाला पाचरण करून तात्काळ मंत्ररूप क्षुरा निर्माण केला, आणि हेच झाले नाभिकाचे हत्यार....

याच हत्याराच्या सहाय्याने नाभिकाने ब्रम्हदेवाची शेंडी राखली आणि ब्रम्हदेवाचे मौजीबंधन विधिवत संपन्न झाले.


अशारीतीने 'नाभिक पुराण' या ग्रंथानुसार शेषणाग हा तमाम नाभिक समाजाचा पूर्वज ठरतो. आणि या नागराजाचा नागपंचमी हा सण राज्यातीलच नव्हे तर देशभरातील तमाम नाभिक समाज बांधव आणि सलून व्यवसायिक या सणाला एक पवित्र आणि महत्वाचा सण म्हणून साजरा करतात.

या दिवशी आपल्या पुर्वजाचा यथा योग्य आदर आणि भक्तीभाव समर्पित करण्यासाठी नाभिक समाज आपला पारंपरिक सलून व्यवसाय आणि दैनंदिन व्यवहार देखील बंद ठेवतात. नागराज तथा नाग नरसोबाच्या प्रतिमेची मनोभावे पुजा अर्चना करुन त्याच्यापुढे नतमस्तक होतात.

या दिवशी नागराजाला दूध, लाह्या यांचा नैवद्य अर्पण करुन अपल्या पूर्वजाचे मनोभावे स्मरण केले जाते आणि एकमेकाला शुभेच्छा देत भक्तिमय वातावरणात आंदोत्सव साजरा केला जातो.

**राज्यातील तमाम नाभिक बांधवाना**
**नागपंचमी सणाच्या मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा !**

## नागराज..



नाग पंचमी आली
हादरूनि गेले नाग
साप नाग पकडाया
अखंडित भागंभाग

कुठेही घुसूद्या नाग
बरोबर काढता माग
जगणे मुश्कील होई
कसे पळे मागोमाग

कसे म्हणावे माणूस
हा माणूसकीलाडाग
सणा बनविले इव्हेंट
मानवी वृत्ती कजाग

पूजा करुन नागाची
दावी मिथ्या अनुराग
विषाच्या गंथी काढी
उगवला संताप राग

भाव वधारले नागांचे
भक्ता हवे तेवढे माग
दूध हवे नागा करिता
पोटात आमच्याआग

वृध्दींगत होअंधश्रद्धा
सहर्ष करतो सहभाग
दंतकथा कैकफसव्या
कशीआणायची जाग

चुंबनघेतात नागोबाचे
स्टंट बाज रे महा भाग
फोटो सेल्फी रिल्सचे
तुडुंब भरलेले विभाग

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## प्रा.रोहन रंधवे यांना आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, श्रीगोंदा :** श्रीगोंदा येथे झालेल्या श्रीगोंदा तालुका क्रीडा समितीच्या बैठकी मध्ये परिक्रमा कॉलेजचे क्रीडा शिक्षक प्रा.रोहन रंधवे यांना जिल्हा क्रीडा कार्यालय व श्रीगोंदा क्रीडा समितीचा या वर्षीचा आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे, जिल्हा क्रीडा समितीचे जिल्हाध्यक्ष नंदकुमार शितोळे, तालुका अध्यक्ष सचिन जामदार, बापूसाहेब गायकवाड, प्रा.सतीश चोरमले व क्रीडा समितीच्या सदस्यांच्या हस्ते देण्यात आला. त्याबद्दल त्यांचे माजी मंत्री बबनराव पाचपुते, परिक्रमा शैक्षणिक संकुलनाच्या अध्यक्षा डॉ.प्रतिभा पाचपुते, सचिव आ. विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी अ‍ॅड. प्रतापसिंह पाचपुते, अकॅडमी डायरेक्टर प्रा.इंद्रायणी पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.अनिल पुंड, डे.अकॅडमी डायरेक्टर प्रा.डॉ.संजीव कदम पाटील, प्रा. डॉ.सुनील निर्मळ, प्रा. डॉ.सुदर्शन गिरमकर, प्रा. मोहन धगाटे, प्रा. डॉ.रमेश शिंदे, प्रा.डॉ.पांडुरंग इथापे,प्रा. डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले आहे.

## वाचक पत्र

### शिवलिंगावर अर्पण केलेले दूध वाया जात नाही !



श्रावणमास सुरु झाला आणि त्यातील पहिला सोमवारही नुकताच सरला. श्रावण मास म्हणजे भगवान शिवाच्या उपासनेचा मास. अनेक शिवभक्त श्रावण मासातील सोमवार व्रतस्थ राहून उपवास करतात. त्यानिमित्ताने शिवमंदिरात जाऊन शिवलिंगाला दुग्धाभिषेक करतात. शिवलिंगामध्ये प्रचंड शक्ती सामावली असल्याने त्यावर ताम्र कलशाद्वारे सतत जलाभिषेक चालू ठेवला जातो. दूध हे जलाहून शीतल असल्याने शिवभक्त श्रद्धेने शिवलिंगावर दुधाने आभिषेक करतात. शिवलिंगावर अर्पण केलेले दूध असेच वाया न घालवता भाविकांना ते तीर्थ स्वरूपात वाटले जाते. शिवलिंगावर अर्पण केलेल्या दुधाचे तीर्थात रूपांतर झाल्यावर शिवलिंगाच्या चैतन्यामुळे त्याच्या चवीत होणारा आमूलाग्र बदल प्रत्येक शिवभक्ताने अनुभवलेला असतो. स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारी मंडळी मात्र श्रावण मास जवळ आला की, 'दूध पिंडीवर सांडून वाया घालवू नका त्याऐवजी ते गरिबांना वाटा' असा कंठशोष करताना आढळतात. मुळात शिवपिंडीवर वाहिलेले दूध कोणत्याही शिवमंदिरात वाया जाऊ न देता ते शिवभक्तांना तीर्थस्वरूपात वाटले जाते. होळी जवळ आली कि कचऱ्याची होळी करा, होळी लहान करा पोळी दान करा, गणेशोत्सवात मूर्तीदान करा यांसारख्या मोहिमा ही मंडळी राबवत असतात. हिंदूंच्या सण उत्सवातील प्रथा परंपरांना आणि धर्मशास्त्रीय विधींना अंधश्रद्धेचे लेबल चिकटवून त्यावर आपली बुद्धी पाजळणारी ही मंडळी अन्य धर्मियांच्या सणांच्या वेळी मात्र मूग गिळून गप्प असतात. सुधारणावादी मंडळींना सुधारणा करायचीच आहे तर मनुष्याच्या वृत्तीमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी वर्षभर प्रयत्न करावेत. केवळ हिंदूंचे सण-उत्सव जवळ आले की धर्मशास्त्राशी तडजोड करण्याचे सल्ले देऊ नयेत.

**– सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

## वाचकांचे मनोगत


केंद्र सरकारच्या शैक्षणिक त्रिभाषा धोरणास महाराष्ट्र सरकारने अनुसरून पहिली पासून हिंदी भाषेला स्थान दिले त्यास महाराष्ट्रातून ठाम विरोध झाला त्यामूळे सरकारनेच काढलेले दोन अध्यादेश मागे घेतले. राज - उद्धव ठाकरे बंधुनी कडाडून विरोध केला. महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी ठाकरे बंधूंच्या निर्णयाला सहमती दिली. साधारण २० हजार हिंदी भाषिक शिक्षकांना महाराष्ट्रात रोजगार उपलब्ध झाला असता. मुंबई- महाराष्ट्रात संपूर्ण देशभरातील सर्व जातीधर्माचे लोक राहतात त्यांना महाराष्ट्राची मातृभाषा मराठी बंधनकारक करायचे सोडून मराठी भाषेलाच दूर लोटण्याचे कारस्थान उघड झाले. त्रिभाषा धोरणात महाराष्ट्रात संस्कृत भाषेचा समावेश करा. महाराष्ट्रातील मराठीच्या मुद्दयावरून भाजपचे खासदार निशिकांत दुबे थेट महाराष्ट्रातील मराठी नेत्यांना आव्हान देत चिथावणीखोर भाषा बोलू लागले त्यांना महाराष्ट्रात राहणार्या परप्रांतीय लोकांकडून विरोध झाला नाही. 'पट पटक के मारेंगे 'निशिकांत दुबेच्या वक्तव्याचा महाराष्ट्राच्या लेकी खासदार वर्षा गायकवाड, प्रतिभा धानोरकर आणि शोभा बच्छाव यांनी संसदेत जय महाराष्ट्रच्या घोषणा देत.दुबेला महाराष्ट्राचे पाणी दाखवले. राज्यांचे राज्यपाल हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधित्व म्हणून नेमलेले आहेत. दैनंदिन राजकारणापासून अलिप्त राहून राज्याच्या समस्यांकडे निष्पक्षपातीपणे पाहायचे असते. असे सर्वसाधारण संकेत आहेत. महाराष्ट्र विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील आमदार, मंत्री यांच्या गैरवर्तनाबद्दल चकार शब्द बोलले नाहीत. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी या संकेताकडे दुर्लक्ष करीत राजभवनातील एका कार्यक्रमात एका राजकीय नेत्याप्रमाणे मराठी - अमराठी भाषीकवादावर व्यक्त होत राज्यातील भूमिपुत्रांना आरोपीच्या पिंजर्यात उभे केले. निष्पक्षपाती अशा संविधानीक पदावर असलेल्या महामहीमांना शोभादायक ठरत नाही.मराठी माणसा जागा हो, रात्र वैर्याची आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**– महादेव गोळवसकर**
**कुर्ला, मुंबई**
**मो.९८६९४७६२०९**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## धोम धरणातून २ हजार क्युसेस पाण्याचा विसर्ग



**अक्षरात : दिलीप कांबळे**
**दि.२८, वाई (सातारा) :** धोम तालुका वाई धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी चालू परिस्थितीत धरणातून कृष्णा नदी पात्रात २ हजार क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. धरण व्यवस्थापनाने वेळ आल्यास वाढवून विसर्ग होणार असल्याचे सांगितले धरण क्षेत्रात सद्यस्थितीत ९० टक्के पाणीसाठा आहे. पाणलोट क्षेत्रात पाऊस चालू असून धरणामध्ये पाण्याची मोठी आवक होत आहे. तरी धरणाखालील कृष्णा नदीकाठच्या सर्व नागरिकांना वस्त्यांना सतर्कतेच्या सूचना दिले आहेत. कोणीही नदीपात्रात उतरू नये नदी काठावरील पाण्याचे पंप नदीकाठीचे शेती अवजारे जनावरे आधी साहित्य तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवण्याच्या सूचना दिल्या आहेत. वाई तालुक्यातील केवळ शेतीच नव्हे तर हजारो शेतकऱ्यांचे जीवनमान समृद्ध करणारे धोम धरण आता पूर्ण क्षमतेने भरण्याच्या मार्गावर आहे. धरणातील जलसाठा वाढला असून सुरक्षिततेच्या दृष्टीने कृष्णा नदीत पाण्याचा विसर्ग सुरू झाला. धरणाच्या भिंतीवरून कोसळणाऱ्या पाण्याचा शुभ्र प्रवाह अथांग पसरलेला धरणाचा नजारा आणि चहूबाजूंनी पसरलेली वनराई हे सार दृश्य पाहताना निसर्गाच्या अद्भुत सौंदर्याचा प्रत्यय येतो हे मनोहरी दृश्य पाहण्यासाठी धरण परिसर व कृष्णा नदीकाठी पर्यटकांची गर्दी पहावयास मिळते.

## मुंबई-गोवा महामार्गासाठी कोकणकरांचा एल्गार
### आता महामार्गावरच सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणार

**अक्षराज : कामेश कदम**
**दि.२८, पेण (रायगड) :** मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामामुळे त्रस्त झालेल्या कोकणवासीयांनी आता आंदोलनाचा नवा आणि निर्णायक टप्पा जाहीर केला आहे. दादर येथील मराठी ग्रंथ संग्रहालयात झालेल्या महत्त्वपूर्ण सभेत कोकणातील ३५ विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी एकत्र येत, रस्ता नाही, तर उत्सव महामार्गावरच! या घोषणेसह संघर्ष तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. या सभेत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, आता प्रत्येक तालुक्यात मुंबई-गोवा महामार्गावरच १० दिवस सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाईल. या अभिनव आंदोलनाचा कळस अनंत चतुर्दशीला पाहायला मिळणार आहे, जेव्हा कोकणवासीय मुंबईतील मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' बंगल्यासमोर गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करून विसर्जन मिरवणूक काढतील. हा निर्णय केवळ प्रशासनाच्या बेपर्वाईविरोधातील लढा नसून, कोकणी जनतेचे प्राण वाचवण्यासाठी देवाला घातलेली आर्त विनवणी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.

बळीराज सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वालम यांनी या लढ्याला पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. हे केवळ आंदोलन नाही, तर हक्काच्या रस्त्यासाठीचे देवाकडे मागणे आहे, असे ते म्हणाले. या आंदोलनाला विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, युवा कार्यकर्ते आणि नागरिक समाजाकडून जोरदार पाठिंबा मिळत आहे. कोकणकरांनी आता सर्व संघटना आणि पक्षीय नेत्यांना या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## मंडणगड मध्ये सावित्री नदीत आढळला बेवारस मृतदेह

**अक्षराज : उमेश तबीब**
**दि.२७, दापोली (रत्नागिरी) :** बाणकोट सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावित्री नदी पात्रात, उमरोली जेट्टी येथे दिनांक २६ जुलै रोजी अंदाजे ३० ते ४० वयोगटातील एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असून, पोलादपूर, महाड, मंडणगड परिसरातून तो नदीपात्रात आल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित पोलीस ठाण्यांशी संपर्क साधून माहिती देण्यात आली असून अद्याप मयत इसमाची ओळख पटलेली नाही. मयत इसमाच्या उजव्या पायाच्या पोटरीवर आई असे मराठीत लिहिलेले आहे. त्याच्या अंगावर पिवळ्या रंगाचा व निळ्या बाह्यांचा टी-शर्ट, काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट व निळ्या रंगाची एडडअ कंपनीची अंडरवेअर आहे. मृतदेह कुजल्यामुळे चेहरा ओळखण्यास अडचण येत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ बाणकोट सागरी पोलीस स्थानकाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## केदार गटाचे समर्थक दिलीप बनसोड यांचा भाजपात प्रवेश



**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.२८, नागपूर :** खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष व केदार गटाचे (कॉंग्रेस) समर्थक दिलीप बनसोड यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर येथील शासकीय रामगिरी बंगल्यावर भाजप मध्ये दिनांक २७ जुलै जाहिर प्रवेश झाला आहे. केदार (कॉंग्रेस) गटाने लढविलेल्या अनेक निवडणूकीत कंत्राटदार दिलीप बनसोड यांचा प्रत्यक्ष सहभाग राहिलेला आहे. मात्र, ते मागील बऱ्याच काळापासून नाराज होते. आमदार डॉ.आशिष देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत दिलीप बनसोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २७ जुलै शासकीय निवासस्थान रामगिरी बंगला येथे प्रवेश केला.

याप्रसंगी आमदार डॉ.आशिष देशमुख यांच्यासह भाजपचे विलास महल्ले, राज्य परिषद सदस्य देविदास मदनकर, माजी जि.प.सदस्य अशोक तांदूळकर आदि उपस्थित होते. दिलीप बनसोड यांचा भाजपात अधिकृत प्रवेश झाल्याबद्दल भाजप वरिष्ठ नेते रमेश जैन, शांताराम गावंडे, शामराव सरोदे, राधाकिसन मित्तल, प्रमोद पिंपळे, अभय घुगल, सुनील जालंदर, अनेस चवरे, विपीन नाईक, राजेश गायकवाड, चंद्रशेखर पानतावणे, नितीन गोस्वामी, राम डाखरे, कमलेश भास्कर, सचिन नागरकर आदिनी अभिनंदन केले.

# शिळफाटा (कल्याण फाटा) येथील श्री दत्त मंदिराचे काम रखडले



**अक्षराज : विनोद वास्कर**
**दि.२८, शिळफाटा (ठाणे) :** शिळफाटा (कल्याण फाटा) येथे पुरातन काळापासूनचे श्री दत्त मंदिर होते. दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त येत होते आणि येतात. दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात येथे साजरा केला जातो. दोन दिवस मोठी जत्रा असते. या मंदिरात दत्तगुरु, संतोषी माता, साईबाबा, श्रीराम, लक्ष्मण, सीता, हनुमान, महालक्ष्मी, अशा अनेक देवतांच्या मुर्त्या या मंदिरामध्ये होत्या. आजही त्या मुर्त्या सांभाळून ठेवल्या आहेत. हे मंदिर हाय स्पीड बुलेट ट्रेन, शिळफाटा पनवेल महामार्गाच्या रस्ता रुंदीकरणात तोडण्यात आले. परमपूज्य स्वामी डी. के.दासबाबा सिताराम सेवा प्रतिष्ठान ट्रस्ट कडून २०२० साली जानेवारी महिन्यात नवीन श्री दत्त मंदिराचे भूमि पूजन करण्यात आले. त्यानंतर श्री दत्त मंदिराचे बांधकाम चालू करण्यात आले. श्री दत्त मंदिराच्या ट्रस्टच्या नावी १८ गुंठे जागा आहे. त्यात हे काम चालू केले होते.

परम पूज्य स्वामी डी.के.दासबाबा सितारामसेवा प्रतिष्ठान ट्रस्ट ने एका वर्षात नवीन मंदिर उभे करून देऊ असे पंचक्रोशीतील भाविक भक्तांना सांगितले होते. २०२५ वर्ष सध्या चालू आहे तरीसुद्धा श्री दत्त मंदिराचे काम पूर्ण झालं नाही. ट्रस्ट कडून मंदिराचे काम पूर्ण होत नसल्याचे दिसून येत आहे.

**५ वर्षे होऊन सुद्धा मंदिर काही पूर्ण होईना**

श्री दत्त मंदिराचे पूर्ण निर्माण कार्य गेल्या अनेक वर्षापासून कुर्म गतीने चालू होते. नंतरच्या काळामध्ये गेल्या ६ महिन्यापासून ते काम बंद अवस्थेत पडले होते. तसेच निर्माण मंदिर खंडर परिस्थितीमध्ये दिसू लागले होते. सूत्रांच्या माहितीनुसार १९ जून २०२५ रोजी ट्रस्टची बैठक झाली. या बैठकीमध्ये ट्रस्टच्या सर्व सदस्यांनी उपसचिव सुनिल आलिमकर यांना एकमताने पुढील शंभर दिवसांमध्ये मंदिर निर्माण कार्याचे काम करण्यासाठी नियुक्त करण्यात आले होते.तशा प्रकारचा त्यांना अधिकार पत्र ही १ जुलै २०२५ रोजी देण्याचे ठरले होते.

नियुक्त झाल्या दिवसापासून सुनिल आलिमकर यांनी आपले काम सुरू केले.नियुक्तीपत्र मिळणे अगोदरच कामाचा नियोजित आराखडा तयार करून स्वतः सुनिल आलिमकर जयपुर, भरतपुर, (राजस्थान) येथे जाऊन तेथील शीराम मंदिरासाठी जे दगड वापरण्यात आले आहे. तसेच तेच दगड व निर्माण कार्य करणारे कारागीर घेऊन आले आणि मंदिर निर्माण कार्याला सुनिल आलिमकर याने जोमाने सुरुवात केली. तसेच नाशिक पंचवटी,देऊ भंडारा डोंगर येथे जाऊन तेथील ह्याच प्रकारची मंदिर निर्माण कार्य बघून त्याचेही अवलोकन करून त्यांनी पुढील या मंदिराचा आराखडा तयार केला होता. १ जुलै २०२५ रोजी पासून नियुक्तीपत्र (ट्रस्टीच्या ठरावाद्वारे) देण्यात येण्याचे ठरले असताना ट्रस्टचे सचिव चंद्रकांत बामा पाटील यांच्याकडून पत्र देण्याचे सातत्याने टाळाटाल होत होती. त्या गोष्टीची सुनिल आलिमकर हे सातत्याने ट्रस्टीच्या वरिष्ठ सदस्यांना कल्पना देत होते परंतु त्यांनीही गांभीर्याने विषय न घेता सचिवांच्या हा.ला. हा करीत राहिले.

सरता शेवटी पुनश्च जोमाने मंदिर निर्माण कार्य सुरू झालेल्या असताना अधिकार पत्राभावी सनिल आलिम कर यांनी नाईलाजाने दिनांक २५ /७/२०२५ रोजी पासून काम बंद केले. ट्रस्ट कडून नियुक्तीपत्र न मिळाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे मंदिराचे काम थांबले आहे. ट्रस्ट कडून नियुक्त पत्र राखून ठेवल्यामुळे मंदिर निर्माण कार्याला बाधा निर्माण करीत आहे. याबाबतीत पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या ट्रस्टला जाब विचारणे गरजेचे आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी ट्रस्टकडे जाब विचारण्यासाठी बैठकीची मागणी केली आहे. बैठकीची तारीख पंचक्रोशीतील भाविक भक्तांना कळविण्यात यावी.

# नागपंचमीच्या दिवशी, सापांच्या जीवाशी खेळ करू नका - सर्पमित्र पटेल

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.२८, विंचूर (नाशिक) :** श्रावण महिन्यातील पहिला सण म्हणजे 'नागपंचमी' सण असून, आपण नागपंचमीच्या दिवशी ज्या नागाची पूजा करतो त्याच दिवशी काही गारुडी पैसे कमावण्यासाठी त्याच नाग देवताला पकडून त्याचे तोंड शिवून किंवा दात काढून, त्यांचे तोंड चिटकून त्यांच्या जीवाशी खेळ करतात, व पैसे कमवतात. असे कृत्य हे कायद्याचे विरुद्ध आहे.

आपण त्यांना साथ देऊन कायद्याच्या विरुद्ध वागू नका व अंधश्रद्धेला बळी पडू नका. सर्पमित्र असिफ पटेल यांनी सांगितले नाग, साप व धामण हे निसर्गातील महत्त्वाचे घटक आहे, पिकांना हनी पोहोचवणाऱ्या उंदीर घुशी व अधि कीटक प्राण्यांवर नियंत्रण ठेवतात. अशा उपयुक्त प्राण्यांचा जीव वाचवणे आपली सर्वांची जबाबदारी आहे.

आपण वारुळावर दूध टाकू नये, अथवा सापाला दूध पाजणेचा प्रयत्न ही करू नये, कारण साप हा कधीच दूध पीत नाही. या अंधश्रद्धेला खतपाणी घालू नये. नागपंचमीच्या दिवशी आपण आपल्या आईच्या अथवा वडिलांच्या नावाने आपल्या शेतामध्ये अथवा घरासमोर एक वृक्ष लावून एक नवीन पद्धत चालू करूयात. म्हणजे हा निसर्ग वाचवण्यासाठी आपलाही हातभार लागेल.



गारुडी मुक्त नागपंचमी साजरी करा

**साप दिसल्यास काय करावे.**
सर्पमित्रांनी नागरिकांना असे आवाहन केले आहे की, गारुडी साप पकडून फिरत असल्यास तसेच आपल्या घराच्या अथवा शेताच्या आसपास साप दिसल्यास, तात्काळ जवळील वनविभागाला किंवा सर्पमित्रांचा संपर्क साधावा, जेणेकरून सापांची सुटका करण्यास मदत होईल. आपल्या सर्व नागरिकांना या नागपंचमीच्या हार्दिक शुभेच्छा सर्पमित्र असिफ पटेल यांनी दिल्या.

# आ. अभिजीत पाटील यांचे वाढदिवसानिमित्त तुंगत येथे आज रक्तदान शिबीर

**अक्षराज : विकास सरवळे**
**दि.२८, पंढरपूर :** माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांचे वाढदिवसाचे औचित्य साधून म तदारसंघातील विविध गावांमध्ये विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याचेच औचित्य साधून तुंगत याठिकाणीही भव्य रक्तदान शिबीरासह मोफत महा आरोग्य व नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कारखान्याचे संचालक विठ्ठल (नाना) रणदिवे यांनी दिली.

आमदार अभिजीत पाटील यांचा १ ऑगस्ट रोजी वाढदिवस असुन विविध उपक्रमांनी तो साजरा केला जातो. तुंगत याठिकाणी आ. अभिजीत पाटील मित्र परिवाराचे वतीने आज २९ जुलै रोजी येथील गणेश मंदिर सभागृहात महा आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



सकाळी ९:३० वाजता भव्य रक्तदान शिबीर घेण्यात येणार असुन यावेळी महा आरोग्य तपासणी शिबीरात रक्तदाब, शुगर, थायराईड, लिव्हर, किडनी, कोलेस्टेरॉल, कॅल्शियम, कॅन्सर आदी विकारासंदर्भात मोफत तपासणी करण्यात येणार आहे. तसेच यावेळी मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार असुन या महा आरोग्य आणि रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संचालक रणदिवे यांनी केले आहे.

# श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने सॅनिटरी पॅड वाटप ; मासिक पाळीबाबत जनजागृती



**वर्षभरात दहा सामाजिक उपक्रम राबविणार : महेश कासट**
श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त वर्षभरात १० उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत पहिला उपक्रम अन्नधान्य वाटप, दुसरा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आणि आता मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वाटप उपक्रम राबविण्यात आला. अशाच पद्धतीने समाज उपयोगी विविध कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट यांनी सांगितले.

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२८, सोलापूर :** श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त १० उपक्रम राबविण्यात येणार असून त्या अंतर्गत मासिक पाळीबाबत जनजागृती शिबिर घेण्यात आले. यावेळी १५० विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी पॅड वाटप करण्यात आले.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने कुंभारी रोड, वंदना पार्क जवळ साईबाबा प्रशालेत मासिक पाळी, सॅनिटरी पॅडबाबत शिबिर घेण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी पॅड वाटप करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मासिक पाळीबाबत मार्गदर्शक राहुल बिराजदार, सामजसेविका लक्ष्मी गजम, अॅड. नीता मंकणी, उद्योजिका वर्षा पाथरकर, साईबाबा प्रशालेचे मुख्याध्यापक तिपन्ना कोळी, संस्थेचे संस्थापक महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात मार्गदर्शन करताना राहुल बिराजदार म्हणाले, मासिक पाळी ही स्त्रीच्या शरीरातील एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. तिच्याकडे लाजेने नाही तर समजून घेण्याच्या दृष्टिकोनातून पाहायला हवे. पाळी दरम्यान योग्य स्वच्छता राखणं हे आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचं आहे. सॅनिटरी पॅड, पाळी कप यांसारख्या सुरक्षित पर्यायांचा वापर आणि त्याबाबत योग्य माहिती मिळणं, ही मुलींच्या आत्मविश्वासासाठी देखील गरजेची बाब आहे. आजही समाजात पाळीबाबत अनेक गैरसमज आणि भीती आहेत. पाळी ही लज्जेची गोष्ट नाही, ती सदृढ आरोग्याची ओळख आहे. असेही ते म्हणाले.

सुत्रसंचालन बाळू जाधव तर आभार प्रदर्शन अंजली भांडवले यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनुशी कासट, अक्षता कासट, भारती जवळे, अश्विनी म्हंता, शुभांगी लचके, अर्चना बंडगर, सायराबानू लाडलेमशाक, संतोष अलकुंटे, आभिजीत व्हानकळस, राजेश केकडे, दिपक करकी, स्वप्निल बिराजदार, भारत सन्नाके, गंगाधर बहिरगोंडे आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# डिकसळ इस्लामपुरा भागात ७० लाख निधीतून पायाभूत सुविधा पूर्ण - शिवसेनेचे नेते पिंगळे यांच्या प्रयत्नांना यश

**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.२८, कळंब (धाराशिव) :** डिकसळ (ता.कळंब, जि.धाराशिव) राज्य शासनाच्या अल्पसंख्याक बहुल ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या ₹७० लाख निधीचा वापर करून मौजे डिकसळ (इस्लामपुरा) परिसरात महत्त्वाची विकास कामे पूर्णत्वास नेण्यात आली आहेत.

या सर्व विकासकामांची प्रेरणा व पुढाकार शिवसेनेचे नेते अजित दादा पिंगळे यांच्या प्रयत्नातून घेण्यात आली असून, शिवसेना तालुका प्रमुख लक्ष्मीकांत हुलजुते आणि डिकसळचे माजी सरपंच अमजद मुल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली याची अंमलबजावणी करण्यात आली.

**पूर्ण झालेली विकासकामे पुढीलप्रमाणे :-**

१.रफीक शेख यांचे घर ते वहाब मनियार यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता - १० लाख

२.मोहम्मदीया मस्जिद ते अस्सलम तांबोळी यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता - १० लाख

३.इम्रान शेख यांचे घर ते नसीर मोमीन यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता - १० लाख

४.युसुफ सय्यद यांचे घर ते अमजद मिर्जा यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता - १० लाख

५.मौजे डिकसळ मुस्लिम कब्रस्तान अंतर्गत सिमेंट कॉंक्रिट रस्ता - १० लाख

६.मुस्लिम कब्रस्तान अंतर्गत संरक्षण भिंत बांधणे - १० लाख

७.मक्का मस्जिद जवळ पावर ब्लॉक उभारणी - १० लाख

एकूण मंजूर व पूर्ण निधी - ७० लाख

या कामांमुळे इस्लामपुरा भागात दळणवळण, सार्वजनिक आरोग्य, धार्मिक स्थळांपर्यंतचा प्रवेश, आणि सुरक्षिततेसंबंधी सुविधा मोठ्या प्रमाणात सुधारल्या आहेत.

स्थानिक रहिवाशांनी या कामांचे स्वागत करत शिवसेनेच्या नेतृत्वाचे विशेष आभार मानले आहेत. शिवसेना पक्षाचे लोकाभिमुख आणि विकासाभिमुख कार्य यामध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे, असे ग्रामस्थांनी नमूद केले.



या विकास कामांबाबत डिकसळ ग्रामपंचायतीचे सदस्य इम्रान मुल्ला, मोबीन मनियार व इर्शाद रफीक सय्यद यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, या भागातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांना गती मिळाल्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचं वातावरण आहे. तसेच त्यांनी शिवसेनेचे नेते अजित दादा पिंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष आभार मानले आणि म्हणाले की, या विकास कामांसाठी सातत्याने पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेण्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले आहे. या कामामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# भारत-पाक बॉर्डरच्या राजाचा पाद्यपूजन सोहळा थाटामाटात संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मुंबई :** मुंबई येथील भारतीय नौदलाच्या बेस शेजारी, कुर्ला एल.बी.एस. मार्गावरील श्री.सिद्धिविनायक गणेश चित्र शाळेत भारत-पाकच्या बॉर्डरच्या राजाची मूर्ती साकारण्यात येत आहे. भारत - पाक पुंछ सीमेवर विराजमान होणाऱ्या या गणेशाची मूर्ती दरवर्षी मुंबईतून काश्मीरला नेली जाते. यंदाचे हे मूर्तीचे सोळावे वर्ष आहे. भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवरील पुंछ जिल्ह्यात विराजमान होणाऱ्या राजाचा पाद्यपूजन सोहळा दिनांक २७ जुलै २०२५ रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.



भारत-पाक बॉर्डरच्या राजाचा पाद्यपूजन सोहळा पार पडला त्यावेळी ईशरदिदी (मानवाधिकार कार्यकर्ता), छत्रपती आवटेदादा, मंगेश मस्तुद, प्रमोद चव्हाण, बाळू राऊत, अजित घगवे, विनीत पटेल, जगदीश बुछडा, अनुप सोनी, किरण भड, सुहेल तसेच प्रोग्रेसिव्ह नेशन एनजीओ चे कार्यकर्ते उपस्थित होते. भारत-पाक सीमेवर पुंछ येथील पुलस्त नदीच्या तटावर मानव अधिकार कार्यकर्त्या व प्राचीन शिव दुर्गा भैरव मंदीर ट्रस्ट उपाध्यक्षा ईशरदीदी तसेच समाजसेवक व शिवनेरी सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष छत्रपती आवटे व प्रोग्रेसिव्ह नेशन एनजीओ कार्यकर्ते यांच्या संयुक्त विद्यमाने या गणेशोत्सवाचे आयोजन केले जाते.

या उत्सवात विराजमान होणाऱ्या गणेशाला भारत-पाक बॉर्डरचा राजा म्हणून संबोधले जाते. भारतीय जवानांना देखील गणेशोत्सव साजरा करता यावा या उद्देशाने मुंबई ही आपली आर्थिक राजधानी आहे आणि मुंबई मध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहतात त्यामुळे मुंबईतून सर्वांचे प्रेम आशिर्वाद घेऊन मानव अधिकार कार्यकर्त्या व प्राचीन शिव दुर्गा भैरव मंदिर ट्रस्ट उपाध्यक्षा ईशरदीदी जम्मू आणि काश्मीर येथील पुंछ या ठिकाणी गणेशाची मूर्ती घेऊन जातात. जम्मू काश्मीर येथे भारतीय जवान मोठ्या हर्ष उल्हासात गणरायाचे स्वागत करतात व जम्मू आणि काश्मीर येथील पुंछ या ठिकाणी गणरायाला विराजमान करण्याचे हे अखंडीत सोळावे वर्ष आहे.

# जनतेच्या प्रश्नावर कॉंग्रेस पुन्हा एकदा रस्त्यावर

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२८, कोकणी पाडा (ठाणे) :** ठाण्यातील कोकणी पाडा परिसरातील बिरसा मुंडा चौक ते काशिनाथ घाणेकर चौक दरम्यान पदपथ आणि सायकल ट्रॅक निसरडे झाल्याने पादचाऱ्यांचे अक्षरशा कंबरडे मोडले आहे. शेवाळ आणि घाण यामुळे अपघातांच्या घटना वाढत असताना ही महापालिका प्रशासन मात्र झोपलय. याविरोधात आता कॉंग्रेस रस्त्यावर उतरली आहे. शेवाळाच्या निसरड्या थरामुळे सकाळी व संध्याकाळी मॉर्निंग वॉकला येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसह अनेक तरुण नागरिक घसरून पडत आहेत.

बदलते ठाणे अशा घोषणा करणाऱ्या महापालिकेचा या परिसराकडे मात्र साफसफाईच्या बाबतीत पूर्ण पणे दुर्लक्ष होत आहे. या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेत, ठाणे कॉंग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण आणि प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह स्वतः झाडू हाती घेऊन पदपथ आणि सायकल ट्रॅकची साफसफाई केली. ब्लिचिंग पावडर टाकून स्वच्छतेचा संदेश दिला. विक्रांत चव्हाण म्हणाले, प्रशासनाच्या डोळ्यासमोर अपघात होत असूनही कोणतीच कारवाई केली जात नाही. झोपलेल्या अधिकाऱ्यांना जाग येण्यासाठी आम्ही ही प्रत्यक्ष कारवाई केली आहे. नुसत्या जाहिराती करून चालणार नाही, नागरिकांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. त्यावर बोलताना राहुल पिंगळे म्हणाले, जर आठ दिवसांत प्रशासनाने पदपथ व सायकल ट्रॅक स्वच्छ करून ते चालण्यासाठी योग्य केले नाहीत, तर आम्ही पदपथावरून न घसरता चालण्याची स्पर्धा अधिकाऱ्यांसाठी ठेवणार आहोत. जो अधिकारी न घसरता चालेल त्याला कॉंग्रेसकडून बक्षीस



दिलं जाईल. या उपक्रमामुळे एकीकडे प्रशासनाच्या हलगर्जीपणावर प्रकाश पडत आहे, तर दुसरीकडे राजकीय जबाबदारीने कॉंग्रेस पक्षाकडून जनतेसाठी पुढाकार घेतला जात आहे. यावेळी ठाणे कॉंग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण, प्रवक्ते राहुल पिंगळे, ठाणे कॉंग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सैनिक हो विद्यार्थिनींनी पाठवली राखी तुमच्यासाठी...

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२८, सातारा :** श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी मजरे विद्यालयाचा सैनिकांसाठी राखी पाठवण्याचा अनोखा उपक्रम श्रावण महिन्यात येणारा रक्षाबंधन हा लोकप्रिय वार्षिक असून या दिवशी सर्व वयोगटातील बहिणी आपल्या भावाला ओवाळून त्यांच्या मनगटा भोवती राखी बांधतात. राखी म्हणजे एक पवित्र आणि आकर्षक दोरा विधिवत बांधतात. ही राखी त्यांच्या भावाकडून त्यांचे रक्षण करण्याचे प्रतीक मानले जाते यांच गोष्टीचा बोध घेऊन आपले सैनिक बंधु ही आपले व आपल्या देशाचे सीमेवर तैनात होऊन रक्षण करत असतात. म्हणून आपण सण उत्सव आनंदाने साजरे करतो. पण ते मात्र या सणाला कुटुंबा पासून दूर असतात. म्हणून त्यांच्यासाठी राखी पाठवण्याची कल्पना विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीना सुचली आणि या राख्या विद्यर्थिनींनी स्वतः बनवून गठीत करुन सोमवार, दिनांक २८ जुलै २०२५ रोजी सातारा उपजिल्हा अधिकारी नागेश पाटील यांच्या मार्फत १५० राख्या सैनिकांना पाठवण्यात आल्या.या बाबत जिल्हा अधिकारी व उप जिल्हाधिकारी यांनी या विद्यार्थ्यांनीनीचे कौतुक केले व सर्व राख्या सैनिक भावा पर्यंत पोहचवण्यांचे आश्वासन दिले हा उपक्रम विद्यालयाचे मुख्याध्यापक खराते तसेच वायदंडे, कांबळे, शिंदे, डॉ.मोहिते, निपाणे व विनोद साळुंखे यांच्या सहकार्याने व मार्गदर्शन संपन्न झाला. या नाविन्यपूर्ण उपक्रमा बाबत संपूर्ण महाराष्ट्रभर चर्चा होत असून विद्यार्थ्यांनीनीचे कौतुक होत आहे. संस्थेचे सचिव झणझणे, उपाध्यक्ष युसुफभाई पटेल सहसचिव महेशं कदम तसेच संचालक दिलीप साळुंखे, रामचंद्र साळुंखे संस्थेचे सर्व पदाधिकारी ग्रामस्थ पालक सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील लोकांन कडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# चांदा खंड खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत सुभाष रघाताटे पॅनल विजयी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, विसापूर (चंद्रपूर) :** चांदा खंड खरेदी विक्री संस्था चंद्रपूर च्या संचालक पदांची निवडणूक रविवारी पार पडली. या निवडणुकीत सुभाष रघाताटे व मनोहर पाऊणकर, दिनेश चोखारे यांचे पॅनल आमने सामने लढतीत होते. मात्र २०२५ ते २०३० यावर्षासाठी झालेल्या निवडणुकीत सुभाष रघाताटे पॅनल सर्व १३ संचालक निवडून आले. यामुळे सहकार क्षेत्रातील चांदा खंड खरेदी विक्री संस्थेत पुन्हा एकदा त्यांच्या पॅनलचा दबदबा निर्माण झाला. यामध्ये मनोहर पाऊणकर व दिनेश चोखारे यांच्या पॅनल चा दारूण पराभव झाला आहे. यावेळी विजयी उमेदवारांनी जल्लोष साजरा केला. चांदा खंड खरेदी विक्री सहकार संस्थेची पंचवार्षिक निवडणूक चंद्रपूर येथील राणी राजकुंवर प्राथमिक शाळा येथे रविवारी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजता दरम्यान पार पडली. या निवडणुकीत इतर मागासवर्गीय गटातून सुभाष रघाताटे, अ- वर्ग सहकारी संस्था प्रतिनिधी गटातून योगानंद विठ्ठलराव ताजने, अनुसूचित जाती / जमाती गटातून प्रकाश मुरारी टिपले, महिला राखीव गटातून कल्पना खेमराज नगराळे व वच्छला देवराव ताजने, विशेष मागासवर्गीय गटातून संदीप कवडू उपासे, ब - वर्ग वैयक्तिक प्रतिनिधी गटातून संजय लक्ष्मण गिरीपुंजे, महेशकुमार गौरकार, रितेश भैय्याची पिंपळशेंडे, विठ्ठल बाबुराव पिंपळकर, किशोर नानाजी मत्ते, कपेश सुभाष रघाताटे, विठोबा लक्ष्मण वराटे यांचा दणदणीत विजय झाला. चांदा खंड खरेदी विक्री सहकारी संस्था मर्यादित चंद्रपूर च्या निवडणुकीत सुभाष रघाताटे पॅनलचे वर्चस्व निर्माण झाले आहे. मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदी त्यांचा अलीकडे पराभव झाला होता. या पराभवाचा वचपा त्यांनी एकहाती सत्ता प्राप्त करून चांदा खंड खरेदी विक्री सहकारी संस्था काबीज करून काढला.



# थोडक्यात

## दिवा शहरात उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाचा अविस्मरणीय सोहळा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७, दिवा (ठाणे) :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दिवा शहरात उत्साह, आनंद आणि शिवसैनिकांच्या जोशात अविस्मरणीय सोहळा पार पडला. दिवा शहरा तर्फे विकास म्हात्रे गेट येथे दिवा शहर संघटिका ज्योती पाटील यांच्या नेतृत्वाखाली वाढदिवस सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या रोषणाईत आणि जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढ्यांचे वाटप करून आनंदोत्सव साजरा केला.



या सोहळ्यात शिवसैनिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवून साहेबांप्रती आपली निष्ठा व्यक्त केली. संपूर्ण दिवा शहरात उत्साह, ऐक्य आणि शिवसेनेचा जयघोष घुमला. या उपक्रमामुळे साहेबांच्या नेतृत्वावर असलेले प्रेम आणि शिवसैनिकांची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली. यावेळी कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे, दिवा शहर प्रमुख सचिन पाटील, दिवा शहर संघटिका ज्योती पाटील, उपशहर प्रमुख मारुती पडळकर, उप शहर संघटक शनिदास पाटील, विभाग प्रमुख रवी रसाळ, योगेश निकम उपविभाग प्रमुख, अशोक आंबोडकर, संदीप राऊत, मंगेश शेलार शाखाप्रमुख, शशिकांत कदम, विलास मुलम, गजानन शेलार, समीर परब उपशाखाप्रमुख, सचिन केसरकर, धनाजी पोवार, सुयोग राणे उपशहर अधिकारी युवा सेना, अमित कुडतरकर, युवा सेना शाखा अधिकारी प्रवीण उतेकर, नागेश पवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाते पिलवलीतील समाजसेवक शंकर य.गोमाणे यांचे निधन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२८, चिपळूण :** स्थानिक समाजकारणात अत्यंत सक्रिय असलेल्या व पाते पिलवली (खोलवाडी) गावाचे भूमिपुत्र शंकर य.गोमाणे (वय ६४) यांचे दिनांक २७ जुलै २०२५ रोजी पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास दुः खद निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने पाते पिलवली आणि परिसरातील पंचक्रोशीतील समाज हळहळला आहे. स्व.शंकर गोमाणे हे एक हरहुन्नरी आणि तडफदार व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे वाडी, गाव, समाज आणि विविध सामाजिक संस्थांशी अत्यंत जवळचे व सक्रिय संबंध होते. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून त्यांनी अनेक वर्षे कुणबी विकास मंडळ, ग्रामीण-मुंबई (रजि.) या संस्थेत ज्येष्ठ सल्लागार म्हणून कार्य केले. त्यांचे समाजाप्रती असलेले प्रेम इतके खोलवर होते की, वहाळ विभागात कुणबी बांधवांसाठी कुणबी भवन व्हावे म्हणून त्यांनी स्वतःची जागा मंडळाला विनामोबदला दिली होती. त्यांची सेवा याची पुरती मर्यादित नव्हती. ते खोलवाडी नवतरुण विकास मंडळ (पाते पिलवली) या स्थानिक संस्थेचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ सल्लागार होते. याशिवाय ओमकार चाळ मित्र मंडळ (दिवा-ठाणे) या सामाजिक संस्थेचे सल्लागार आणि श्री पाणबुडी देवी कलामंच (मुंबई) या सांस्कृतिक मंडळाचे प्रमुख सल्लागार म्हणून ते कार्यरत होते. त्यांच्या निधनामुळे पाते पिलवली-वहाळ पंचक्रोशीत सामाजिक चळवळीतील एक आधारस्तंभ हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यांचे समर्पित सामाजिक योगदान, संयमशील स्वभाव आणि लोकसंग्रह यामुळे त्यांची अनेक ठिकाणी ओळख होती. समाजहितासाठी त्यांनी अनेक वेळा स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवून काम केले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार असून, त्यांच्या अंत्यदर्शनासाठी पंचक्रोशीतील अनेक समाजबांधव, सहकारी, नातेवाईक आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



## 'स्वच्छ घर, स्वच्छ झोपडपट्टी' मोहीम व जनजागृती

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** ०१ जुलैपासून सुरू झालेल्या 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियाना अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज स्वच्छता व आरोग्य विषयक विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये लोकसहभागावर भर दिला जात असून सेक्टर्स प्रमाणेच गावठाण व झोपडपट्टी भागातही स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत. तसेच स्वच्छता विषयक व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याच अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व स्मिता काळे आणि परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपआयुक्त संजय शिंदे यांच्या निरीक्षणाखाली आठही विभागांचे सहाय्यक आयुक्त व स्वच्छता अधिकारी यांच्या माध्यमातून झोपडपट्टी परिसरात 'स्वच्छ घर, स्वच्छ झोपडपट्टी' मोहीमा राबविण्यात आल्या तसेच घरातूनच कचरा वर्गीकरण करण्याचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. त्याचप्रमाणे हा वर्गीकरण झालेला कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकता महानगरपालिकेच्या कचरा गाड्यांमध्येच टाकावा याची दक्षता घेण्याचेही आवाहन नागरिकांना करण्यात आले. नेरुळ विभागाचे सहा.आयुक्त जयंत जावडेकर व स्वच्छता अधिकारी अरुण पाटील यांच्या माध्यमातून शिवाजीनगर झोपडपट्टी या ठिकाणी, तुर्भे विभागाचे सहा.आयुक्त सागर मोरे व स्वच्छता अधिकारी जयेश पाटील यांच्या नियंत्रणाखाली हनुमान नगर झोपडपट्टी येथे, घणसोली विभागाचे सहा.आयुक्त उत्तम खरात आणि स्वच्छता अधिकारी विजय पडघन यांच्या नियंत्रणाखाली काफरीबाबा नगर येथे, ऐरोली विभागाचे सहा.आयुक्त सुनिल काठोळे आणि मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या नियंत्रणाखाली समतानगर ऐरोली नाका याठिकाणी, दिघा विभागाचे सहा.आयुक्त नैनेश बदले व स्वच्छता अधिकारी प्रविण थोरात यांच्यामार्फत दुर्गानगर, गणेशनगर या झोपडपट्टी भागात तसेच इतर विभाग कार्यालयांच्या हद्दीतही विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच स्वच्छताकर्मी यांच्या मदतीने 'स्वच्छ घर, स्वच्छ झोपडपट्टी' ही मोहीम यशस्वीरित्या राबविली. या मोहिमेत ठिकठिकाणी नागरिकही उत्साहाने सहभागी झाले होते. सफाई मोहीम झाल्यानंतर स्वच्छतेची शपथ घेण्यात आली व त्यानुसार नियमित कचरा वर्गीकरणाची व कचरा योग्य ठिकाणी टाकण्याची सवय अंगीकारण्याचे आवाहनही करण्यात आले.

